




# कनिष्ठ महाविद्यालयातील बातम्या

परमाणु ऊर्जा विभागाच्या सहसचिव मॅडम सुषमा तायशेटे, यांनी परमाणु ऊर्जा शिक्षण संस्थेचे माननीय अध्यक्ष डॉ. व्ही.पी. वेणुगोपालन, व सचिव श्री. पी. लाहिरी यांच्यासह परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालयाला ८ एप्रिल २०२२ रोजी भेट देऊन महाविद्यालयाच्या विविध पायाभूत सुविधांचे गुणात्मक आणि परिमाणात्मक साठ्याचे पुनर्मूल्यांकन केले. मान्यवरांनी जुन्या तसेच नवीन विभागातील वर्गखोल्या आणि प्रयोगशाळांना भेट दिली. उत्तम उपकरणांनी सुसज्ज आणि सुस्थितीत असलेल्या प्रयोगशाळा पाहून त्यांना आनंद झाला. जीवशास्त्र प्रयोगशाळेत आजपर्यंत जतन केलेले काही जीवाश्म नमुने पाहून ते थक्क झाले. मॅडम ताईशेटे आणि डॉ. वेणुगोपालन केवळ दुर्मिळ ग्लोसोप्टेरिसच नव्हे तर ट्रायलोबाइट जीवाश्माचे दुर्मिळ ५२० दशलक्ष वर्ष जुने मॉडेल पाहून आनंदित झाले.



बीएमसीच्या प्रामाणिक पाठींब्या मुळे पहिली लसीकरण मोहीम २५/२/२०२२ रोजी चांगली पार पडली. पहिल्या मोहिमेला मोठा प्रतिसाद आणि मोठ्या यशाचा परिणाम म्हणून, महाविद्यालयाच्या परिसरात दुसरी कोविड लस मोहीम आयोजित करण्यासाठी भागधारकांकडून कळकळीची विनंती करण्यात आली होती; म्हणून कनिष्ठ महाविद्यालयात कोविड विरूद्ध दुसरी कोविशील्ड लस ९/०४/२०२२ या दिवशी देण्यात आली. याचा लाभ २०० विद्यार्थ्यांनी तसेच इतरांनी घेतला.



परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालयाच्या हॉलमध्ये मुंबई येथील परमाणु ऊर्जा शिक्षण संस्थेच्या अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींच्या संघटनेने ( १४/०४/२०२२ राष्ट्रीय सुट्टी असल्याने ) ३० एप्रिल २०२२ रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या श्रद्धेने व उत्साहाने साजरी केली. भारतीय राज्यघटनेचे जनक, दलितांचे प्रतिनिधित्व करणारे, विद्वान, वकील आणि सामाजिक न्यायाचे कार्यकर्ता, आधुनिक भारताच्या संविधानाचे शिल्पकार म्हणून पाया रचणारे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३१ व्या जयंती निमित्त विनम्र अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे भाभा परमाणु संशोधन केंद्राचे १३ वे संचालक डॉ. अजित कुमार मोहंती आणि सन्माननीय पाहुणे परमाणु ऊर्जा शिक्षण संस्थेचे सचिव श्री. पी. लाहिरी यांच्या उपस्थितीत परमाणु ऊर्जा शिक्षण संस्थेच्या कर्मचाऱ्यांच्या शेकडो सदस्यांनी श्रद्धांजली वाहिली

२ मे २०२२ रोजी द्वितीय वर्ष कनिष्ठ महाविद्यालाच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. त्यादिवशी प्रथम वर्ष कनिष्ठ महाविद्यालाच्या विद्यार्थ्यांनी त्यांच्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. प्राचार्य डॉ. आनंद कुमार, उपप्राचार्य श्री. ज्ञानेश्वर आर. मोहरीर व शिक्षकांनी तसेच प्रथम वर्ष कनिष्ठ महाविद्यालाच्या विद्यार्थ्यांनी त्यांना पुढील प्रवासासाठी यशाच्या शुभेच्छा दिल्या. प्रत्येक विद्यार्थ्याला माजी विद्यार्थी कार्ड देण्यात आले



'शाश्वत भविष्यासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञानाकडे एकात्मिक दृष्टीकोन' या थीमवर राष्ट्रीय तंत्रज्ञान दिन २०२२ साजरा करण्यासाठी, परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद कुमार व उपप्राचार्य श्री. ज्ञानेश्वर आर. मोहरीर यांच्या समर्थ मार्गदर्शनाखाली परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालयाच्या साठ विद्यार्थ्यांनी ११ आणि १२ मे २०२२ रोजी परमाणु ऊर्जा विभागाच्या परिषद केंद्रामध्ये आयोजित प्रदर्शन आणि प्रश्नमंजुषा स्पर्धेत भाग घेतला. दोन्ही दिवशी डॉ. धनुर्धर झा विद्यार्थ्यांसोबत कार्यक्रमस्थळी गेले.

परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी भावना गुंडलापल्लीने ( २०१२ – २०१४ ) इयत्ता १२ वी नंतर नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ फॅशन टेक्नॉलॉजी मुंबई येथून फॅशन आणि डिझाईन मध्ये आपले करियर केले. तिने २६ जून २०२२ रोजी परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांशी फॅशन आणि डिझाईन या विषयावर संवाद साधला. सर्वाधिक मागणी असलेल्या करिअरपैकी एक म्हणून फॅशन आणि डिझाईन का निवडावे याबाबत विद्यार्थ्यांना उत्तम माहिती मिळाली.



परमाणु ऊर्जा सेंट्रल स्कूल आणि कनिष्ठ महाविद्यालयच्या स्थानिक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष डॉ. ए.के. त्यागी, संचालक, रसायनशास्त्र समूह, भाभा परमाणु संशोधन केंद्र यांच्या ठिकाणी श्री. सी. जी. कऱ्हाडकर, संचालक, परमाणुभट्टी समूह, भाभा परमाणु संशोधन केंद्र हे नवीन अध्यक्ष म्हणून रुजू झाले. श्री. सी.जी. कऱ्हाडकर यांनी ०३/०६/२०२२ रोजी परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालयात त्यांच्या स्थानिक व्यवस्थापन समिती कार्यालयाचा पदभार स्वीकारला.

परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालयाच्या होमी भाभा हॉलमध्ये ज्युनियर सायन्स ऑलिम्पियाड आणि ज्युनियर मॅथेमॅटिक्स ऑलिम्पियाड अभिमुखता कार्यक्रम ६ जून ते १५ जून २०२२ पर्यंत आयोजित करण्यात आला होता. यात भारतभरातील ३१ परमाणु ऊर्जा केंद्रीय विद्यालय आणि कनिष्ठ महाविद्यालयातील ५० विद्यार्थ्यांनी भाग घेतला होता. सर्व सहभागी आणि शिक्षकांनी परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. ज्ञानेश्वर आर. मोहरीर, श्री. प्रमोद तनपुरे ( शारीरिक शिक्षण शिक्षक - वरिष्ठ श्रेणी आणि डॉ. धनुर्धर झा ( पदव्युत्तर प्रशिक्षित शिक्षक, हिंदी ) यांचे उत्कृष्ट पायाभूत सहाय्यासाठी आणि संसाधनात्मक शैक्षणिक प्रवचन आणि सादरीकरणाबद्दल मनापासून आभार व्यक्त केले.



महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ द्वारे मार्च आणि एप्रिल २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचे निकाल जाहीर झाल्यानंतर, १७ जून २०२२ रोजी विद्यार्थ्यांना गुणपत्रिका देण्यात आल्या. प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांकावर असलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांची नावे खालील प्रमाणे

### व्यवसाय शाखा (पहिल्या तीन क्रमांकाचे मानकरी)



आशिष वायचल



आकांक्षा तांदळे



ईशा दिवांग

### विज्ञान शाखा (पहिल्या तीन क्रमांकाचे मानकरी)



धुरी यश राजेश



शैली कुमारी महतो



क्षितिज जाधव

### वाणिज्य शाखा (पहिल्या तीन क्रमांकाचे मानकरी)



दीपिका व्यंकट सुब्रमण्यन



कशिश मनोहर वैती



फाल्गुनी ठाकोर



मानवतेसाठी योग: होमी भाभा हॉलमध्ये आठवा आंतरराष्ट्रीय योग दिन २१ जून २०२२ रोजी साजरा करण्यात आला. श्री. प्रमोद तनपुरे ( शारीरिक शिक्षण शिक्षक - वरिष्ठ श्रेणी ) आणि श्रीमती स्नेहा गुप्ता ( शारीरिक शिक्षण शिक्षिका ) यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात सर्व विद्यार्थी आणि शिक्षक सहभागी झाले होते. १२ - बी चा कुमार जनमंजय वर्मा याने विविध योगासनांचे पी.पी.टी .सादर करून कार्यक्रमास सर्व सहकार्य केले आणि प्रत्येक आसनाचे महत्त्व देखील सांगितले



परमाणु ऊर्जा. कनिष्ठ महाविद्यालय मुंबईला २८ जून २०२२ रोजी स्वच्छ विद्यालय पुरस्काराच्या माध्यमातून जिल्हास्तरीय पंचतारांकित मानांकन देण्यात आले तेव्हा हा आनंदाचा क्षण होता. हा पुरस्कार भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने दिला आहे.



'परमाणु उर्जा विदयालय विकास निधी' ची पहिली बैठक ७ जुलै रोजी प्राचार्यांच्या कार्यालयात झाली. ही बैठक महत्त्वपूर्ण होती कारण त्यात आर्थिक वर्ष २०२२-२३ साठी प्रस्तावित अर्थसंकल्पीय वाटप करण्यात आले होते.

नवीन सत्राची पहिली पालक-शिक्षक-प्राचार्य सभा इयत्ता १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी ९ जुलै २०२२ रोजी डॉ. होमी भाभा सभागृहात घेण्यात आली. १५० हून अधिक पालक आणि विद्यार्थी प्रत्यक्ष बैठकीला उपस्थित होते. सकाळी साडेनऊ वाजता प्राचार्यांच्या भाषणाने सभेची सुरुवात झाली आणि विद्यार्थ्यांनी वेळेचे व्यवस्थापन कसे करावे आणि सामग्री-धारणा कशी करावी हे त्यांनी ग्राफिक पद्धतीने दाखवून दिले. त्या दिवशीही, त्यांनी पुनरुच्चार केला की विद्यार्थ्यांनी त्यांच्या दैनंदिन धड्यातील सामग्री अद्ययावत करण्यासाठी किमान चार तास स्वयं-अभ्यासासाठी दिले पाहिजेत. या बैठकीत सखोल आणि महत्त्वपूर्ण चर्चा, समोरासमोर संवाद, तात्काळ संवेदना, आवश्यक मूल्यमापन आणि शैक्षणिक योजना, एमएस बोर्ड परीक्षा-२०२३ पूर्वीची प्रगती आणि मूल्यमापन यांच्या संदर्भात प्रतिसादात्मक मुद्द्यांवर चर्चा झाली. त्यानंतर दुपारी २:०० वाजेपर्यंत नियोजित ठिकाणी शिक्षक-विद्यार्थी-पालकांच्या भेटीगाठी सुरू होत्या.

परमाणु ऊर्जा शिक्षण संस्था, सुरक्षा, भाभा परमाणु संशोधन केंद्र आणि डी. सी. एस. ई. एम. मधील सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेने परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालने १३ ते २२ जुलै २०२२ या कालावधीत सुब्रतो मुखर्जी स्पर्धेचे आयोजन केले होते. एकूण ५४ सामने मुंबई जिल्हा, महाराष्ट्रातील आंतर-१०८ संघांमध्ये खेळले गेले. श्री. प्रमोद तनपुरे ( शारीरिक शिक्षण शिक्षक - वरिष्ठ श्रेणी, कनिष्ठ महाविद्यालय ) हे कार्यक्रमाचे संपूर्ण प्रभारी होते. आठ दिवसांचे सामने आणि अंतिम दिवशीचा पुरस्कार सोहळ्याचे ठिकाण कनिष्ठ महाविद्यालयचे मैदान होते. कॉलनी आणि कनिष्ठ महाविद्यालयाच्या परिसरात अशा प्रकारचा हा पहिलाच कार्यक्रम होता.

भाभा परमाणु संशोधन केंद्राच्या इस्पितळात असलेल्या मानसशास्त्र विभागातील डॉ. अदिती चौधरी आणि डॉ. गिबी थारियाथू यांनी ३१/०७/२०२२ रोजी कनिष्ठ महाविद्यालयातील १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी 'लैंगिक छळावर लैंगिक संवेदना' या विषयावर जागरूकता व्याख्यान मुले आणि मुलींसाठी स्वतंत्रपणे आयोजित करण्यात आले. मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी अनोखे प्रश्न विचारल्यामुळे संवेदनशील मुद्दे समोर आले. या मुद्यांना अनुसरून डॉ. अदिती चौधरी आणि डॉ. गिबी थारियाथू यांच्याकडून विद्यार्थ्यांना योग्य प्रतिसाद मिळाला. तरुण अभ्यासकांसाठी अशी सत्रे खूप महत्त्वाची आहेत असे वाटले.









१२/०८/२०२२ रोजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या डॉ. होमी भाभा हॉलमध्ये परमाणु ऊर्जा शिक्षण संस्था समूह-स्तरीय प्रश्नमंजुषा परमाणु उर्जा केंद्रीय विद्यालयातील इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित करण्यात आली होती. परमाणु ऊर्जा शिक्षण संस्थेच्या केंद्रीय कार्यालयाकडून मिळालेल्या अल्प सूचनेवर आयोजित करण्यात आली. परमाणु उर्जा कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आनंद कुमार हे नियोजक होते शिवाय कार्यक्रमातील प्रश्नमंजुषाचे सादरीकरण त्यांनीच केले. सर्व विषयांवर प्रश्न विचारण्यात आले. या स्मृती प्रश्नांनी सगळ्यांना आकर्षित केले. प्राचार्यांनी सहभागींना तसेच श्रोत्यांना आकलनक्षमता वाढवण्याची प्रेरणा दिली. परमाणु उर्जा केंद्रीय विद्यालय - तारापूरने परमाणु उर्जा केंद्रीय विद्यालय - काक्रापार, मुंबई - १ ( परमाणु उर्जा केंद्रीय विद्यालय -२, ४ आणि ५ ) आणि मुंबई - २ ( परमाणु उर्जा केंद्रीय विद्यालय -६, ३ आणि १) पेक्षा जास्त गुण मिळवून समूह-स्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धा जिंकून अंतिम फेरी गाठली.

त्याचप्रमाणे, २५/०८/२०२२ रोजी त्याच ठिकाणी परमाणु ऊर्जा शिक्षण संस्थेची राष्ट्रीय स्तरावरील प्रश्नमंजुषा यावेळी देखील परमाणु ऊर्जा शिक्षण



संस्थेच्या केंद्रीय कार्यालय कडून प्राप्त झालेल्या तीन दिवसांच्या नोटिस कालावधीवर परमाणु उर्जा कनिष्ठ महाविद्यालय द्वारे आयोजित करण्यात आली होती. परमाणु ऊर्जा शिक्षण संस्थेचे सचिव श्री. पी. गोवर्धन उद्घाटन सत्रात प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्नमंजुषेचा कार्यक्रम उत्सुकतेने आणि वेळेची सतर्कता ठेऊन टाळ्यांच्या कडकडाटात रंगला. स्पर्धक,



परमाणु उर्जा केंद्रीय विद्यालय - तारापूर, जादुगुडा, कुडनकुलम आणि केंद्रीय विद्यालय संघटन - मानखुर्द यांनी स्पर्धेदरम्यान अत्यंत प्रशंसनीय मनोवृत्ती दाखवली. परमाणु उर्जा केंद्रीय विद्यालय - तारापूर आणि परमाणु उर्जा केंद्रीय विद्यालय - जादुगुडा यांना अनुक्रमे विजेते आणि उपविजेते संघ घोषित करण्यात आले.

समापन समारंभात एन. आर. बी. चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. के.व्ही. रवी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. परमाणु ऊर्जा शिक्षण संस्थाचे अध्यक्ष डॉ. व्ही. पी. वेणुगोपालन आणि परमाणु ऊर्जा शिक्षण संस्थेचे सचिव श्री. पी. गोवर्धन हे अतिथी आणि विशेष अतिथी म्हणून समारोपाच्या कार्यक्रमाला उपस्थित होते.



परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालयात ७६ वा स्वातंत्र्यदिन मोठ्या देशभक्तीच्या उत्साहात साजरा करण्यात आला. या सोहळ्यात अकरावी आणि बारावीचे विद्यार्थी सहभागी झाले होते. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८:१५ वाजता प्राचार्यांच्या हस्ते तिरंगा फडकावून राष्ट्रगीताने झाली. त्या शुभ दिवशी प्राचार्यांच्या प्रेरणादायी भाषणानंतर विद्यार्थ्यांनी भाषणे व गाणी सादर केली. सकाळी १०:३० वाजता कार्यक्रमाची सांगता झाली.




प्रथम वर्ष कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे १२/०८/२०२२ रोजी कनिष्ठ महाविद्यालयाकडून औपचारिक स्वागत करण्यात आले. १६/०८/२०२२ पासून त्यांचे सामान्य वर्ग सुरू झाले.

श्री. सुधीर खुल्लर, पदव्युत्तर प्रशिक्षित शिक्षक, इंग्लिश आणि श्री. महेश एम. वालेंद्र लॅब. सहाय्यक यांना परमाणु ऊर्जा शिक्षण संस्थेच्या केंद्रीय



कार्यालयाच्या कार्यान्वयन समितीने आयोजित केलेल्या हिंदी राजभाषा वक्तृत्व स्पर्धेत अनुक्रमे प्रथम आणि तृतीय पारितोषिक मिळाल्याबद्दल परमाणु ऊर्जा शिक्षण संस्थेमार्फत सन्मान प्रमाणपत्र देण्यात आले. त्यांनी परमाणु उर्जा कनिष्ठ महाविद्यालयच्या प्राचार्यांकडून १७/०८/२०२२ रोजी गुणवत्तेचे प्रमाणपत्र प्राप्त केले.

तसेच, परमाणु उर्जा कनिष्ठ महाविद्यालयचे नऊ विद्यार्थी आणि श्री. प्रमोद तनपुरे, ज्यांनी भाभा परमाणु संशोधन केंद्र येथे आयोजित ७६ व्या स्वातंत्र्य दिन परेडसाठी मौल्यवान स्वयंसेवी सेवा बजावली. त्यांना १७/०८/२०२२ रोजी प्रशंसा प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. प्रमाणपत्र मिळालेल्या कनिष्ठ महाविद्यालयाच्या नऊ विद्यार्थ्यांची नावे आहेत: आकाश रामचंद्रन, आसवानी महेंद्र सिंग, आयुष मोरे, हेरंब साळवी, महावीर कुमार मीना, प्रतीक जगताप, रजत चिकाटे, सिद्धांत भुजबळ आणि यश झावरे.



बोर्ड – २०२३ च्या शैक्षणिक विद्यार्थ्यांकडे विशेष लक्ष देण्यासाठी, महाविद्यालयच्या व्यवस्थापनाने निदान आणि उपचारात्मक उपाय योजण्याची योजना आखली आहे. त्यानंतर गुणात्मक शिक्षण आणि वैज्ञानिक मूल्यांकन, शिक्षकांद्वारे केले जातील. याचा लाभ विद्यार्थ्यांना बोर्डाच्या परीक्षेला नक्कीच होणार असा विश्वास परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांना आहे. प्राचार्य आणि शिक्षक यांच्यातील विचारमंथन चर्चा उपचारात्मक वर्ग आणि मासिक मूल्यमापनांची आवर्ती वैशिष्ट्ये म्हणून एक आराखडा बनवते. सध्या सुरू असलेल्या दोन्ही योजना चांगल्या प्रकारे राबविल्या जात आहेत.

इयत्ता बारावीच्या विद्यार्थांसाठी प्रथम घटक चाचणी – व्यवसाय, विज्ञान आणि वाणिज्य – सर्व विषयांसाठी २५/०७/२०२२ ते २८/०७/२०२२ पर्यंत दोन बैठकींवर आयोजित करण्यात आली होती. तसेच द्वितीय घटक चाचणी २५/०८/२०२२ ते २९/०८/२०२२ पर्यंत आयोजित करण्यात आली होती. इयत्ता अकरावीच्या विद्यार्थ्यांची प्रथम घटक चाचणी आणि इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांची सराव चाचणी २८/०९/२०२२ पासून सुरु झाली.

परमाणु ऊर्जा शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. व्ही. पी. वेणुगोपालन आणि सचिव श्री. पी. गोवर्धन यांच्या उपस्थितीत डॉ. सुगम कुमार, एस. ओ. – एफ, सॉलिड स्टेट फिजिक्स डिव्हिजन, भाभा परमाणु संशोधन केंद्र यांनी परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता ११ वीच्या विद्यार्थ्यांसाठी आणि परमाणु ऊर्जा केंद्रीय विदयालय – ४ च्या इयत्ता ११ वीच्या विद्यार्थ्यांसाठी २७/०८/२०२२ रोजी दुपारी १ ते 3 वाजेपर्यंत डॉ. होमी भाभा हॉल, परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालयामध्ये ‘परमाणु संरचना या विषयावर विशेष व्याख्यान सादर केले. डॉ. कुमार यांनी व्याख्यानाचा पहिला भाग म्हणून नवीन विद्यार्थ्यांसाठी मूलभूत परमाणु रचनेवर एक सोपा प्रबंध सादर केला. या व्याख्यानाने प्रेक्षकांचे प्रबोधन झाले.

इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मेटल्स, मुंबई चॅप्टरच्या मेटल्स अँड मटेरियल क्विझचे आयोजन २७ ऑगस्ट २०२२ रोजी परमाणु ऊर्जा विभागाच्या परिषद केंद्रात करण्यात आले होते. परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालयाचे दोन विद्यार्थी, १२ - डी चा अश्विन नायर आणि १२ - बी चा जनमंजय के. वर्मा यांनी या स्पर्धेत भाग घेतला.



पद्मभूषण मेजर ध्यानचंद यांच्या ११८ व्या जयंतीनिमित्त २९/०८/२०२२ रोजी महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिन- २०२२ ची ११ वी आवृत्ती मोठ्या श्रद्धेने साजरी करण्यात आली. मेजर ध्यानचंद सिंह यांच्या फोटोला प्राचार्यांनी पुष्पहार अर्पण केल्यानंतर, शिक्षक व विद्यार्थी यांनी या दिवसाचे महत्त्व आणि हॉकीचे ताईत आणि जादूगार पद्मभूषण मेजर ध्यानचंद यांच्या योगदानाबद्दल भाषणे सादर केली तसेच १९२८, १९३२ आणि १९३६ च्या ऑलिम्पिकमध्ये भारताला तीन सुवर्णपदके जिंकण्यात त्यांनी कशी मदत केली याबद्दल देखील सांगण्यात आले.

३०-०८-२०२२ रोजी प्राचार्यांच्या कार्यालयात राजभाषा कार्यान्वयन समितीची पहिली बैठक झाली. हिंदी दिवस निमित्त ०१-०९-२२ ते १४-०९-२०२२ पर्यंत हिंदी पंधरवडा पाळण्याचा प्रस्ताव समितीचे प्रभारी डॉ. धनुर्धर झा ( पदव्युत्तर प्रशिक्षित शिक्षक, हिंदी ) यांनी मांडला. पंधरवड्यात विद्यार्थ्यांसाठी हिंदी भाषण व निबंध स्पर्धा घेण्याचा प्रस्ताव होता. या प्रस्तावाला प्राचार्यांनी मान्यता दिली.



वेळापत्रकानुसार सप्टेंबर २०२२ पर्यंत सी.सी.ए. कार्यक्रम यशस्वीरित्या आयोजित करण्यात आले आहेत. श्रीमती हेमामालिनी पी एन मेनन ( पदव्युत्तर प्रशिक्षित शिक्षिका -वरिष्ठ श्रेणी, इंग्रजी ) हया सी.सी.ए. च्या प्रभारी होत्या. त्यांनी सकाळी परिपाठ झाल्यानंतर विविध स्पर्धांतील विजेत्यांची नावे घोषित केलीत.

परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालयात ६१ वा शिक्षक दिन मोठ्या श्रद्धेने साजरा करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ८:१० वाजता सामान्य



प्रार्थनेने-प्रतिज्ञा-विचाराने झाली. त्यानंतर स्वतंत्र भारताचे दुसरे राष्ट्रपती भारतरत्न डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून, दीपप्रज्वलन करून आदरांजली वाहण्यात आली. तसेच हया कार्यक्रमात भाषणे व गीते सादर केली. १२ सी आणि १२ इ च्या सत्यम भैंसा आणि अवंतिका सिंग यांनी अनुक्रमे विद्यार्थी-प्राचार्य आणि विद्यार्थी-उपप्राचार्यपदाचा कार्यभार स्वीकारला. इयत्ता ११ वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी इयत्ता १२ वी च्या काही विद्यार्थ्यांची शिक्षक म्हणून निवड करण्यात आली. सकाळी १०:१० वाजता कार्यक्रम संपला. सकाळी १०:२० वाजता सर्व शिक्षक परमाणु ऊर्जा शिक्षण संस्थेच्या सामुहिक कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी नाभिकिया उर्जा भवन (एन.यु.बी.) सभागृह, एन.पी.सी.आय.एल. येथे गेले. ‘सामुहिक शिक्षक दिन सोहळा’ हा कार्यक्रम एन.यु.बी. च्या सभाग्रहामध्ये परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालयाद्वारे समन्वित आणि यशस्वीरित्या आयोजित करण्यात आला. पाच दिवस सुट्ट्या आल्या तरी परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी कमी वेळेत कार्यक्रम नियोजनबद्ध तयारी करून पार पाडला.



# सेवानिवृत्ती



श्री. आर.एम. नागराजन, पदव्युत्तर प्रशिक्षित शिक्षक - वरिष्ठ श्रेणी, विषय – गणित हे ३०/०४/२०२२ रोजी तीस वर्षांच्या समर्पित सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. १९९२ मध्ये रावतभाटा येथील त्यांच्या सुरुवातीच्या नियुक्तीनंतर ते परमाणु ऊर्जा शिक्षण संस्था मध्ये रुजू झाले होते, नंतर त्याच वर्षी त्यांची परमाणु ऊर्जा केंद्रीय विद्यालय कैगा येथे बदली झाली जिथे त्यांनी ११ वर्षे म्हणजे २००३ पर्यंत काम केले आणि तेथून त्यांनी परमाणु ऊर्जा केंद्रीय विद्यालय -४ आणि कनिष्ठ महाविद्याल मुंबई येथे १९ वर्ष म्हणजे सेवानिवृत्तीपर्यंत काम केले. वर्गातील अध्यापन आणि परमाणु ऊर्जा शिक्षण संस्थेच्या सेवांच्या सुसंगत अंकगणित प्रगतीप्रमाणे त्यांची गणितीय ताकद आणि लोकप्रियता वाढली.

श्री. दत्ताराम जाधव, प्रयोगशाळा सहाय्यक - भौतिकशास्त्र, ३१ मे २०२२ रोजी सेवानिवृत्त झाले. ते ०४/०१/१९८८ रोजी परमाणु ऊर्जा केंद्रीय



विद्यालय - २ येथे परमाणु ऊर्जा शिक्षण संस्थेच्या सेवेत रुजू झाले होते, जिथे त्यांनी दहा वर्षे काम केले. त्यानंतर १९९८ मध्ये कनिष्ठ महाविद्यालया मध्ये बदली झाली आणि सेवानिवृत्त होईपर्यंत येथे काम केले. त्यांच्या संपूर्ण सेवा कारकिर्दीत त्यांची परमाणु ऊर्जा शिक्षण संस्थेची सेवा प्रशंसनीय राहिली.



श्रीमती एल्सी पीटर पदव्युत्तर प्रशिक्षित शिक्षिका - वरिष्ठ श्रेणी , विषय - गणित हया ३१/०७/२०२२ रोजी परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालयातून सेवानिवृत्त झाल्या. २८/०६/१९८९ रोजी त्या परमाणु ऊर्जा केंद्रीय विद्यालय हैदराबादमध्ये प्रशिक्षित पदवीधर शिक्षिका म्हणून रुजू झाल्या होत्या. त्यांच्या पदोन्नतीच्या बदलीनंतर त्यांनी ०९/०७/१९९२ ते २६/०४/१९९४ पर्यंत परमाणु ऊर्जा केंद्रीय विद्यालय मनुगुरु येथे पदव्युत्तर प्रशिक्षित शिक्षिका म्हणून काम केले. नंतर पुन्हा परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालय हैदराबाद येथे पदव्युत्तर प्रशिक्षित शिक्षिका म्हणून बदली झाली आणि २७/०४/१९९४ ते ०९/०२/२००१ पर्यंत तेथे सेवा दिली. त्यांची शेवटची बदली परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालय हैदराबाद येथून परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालय मुंबई येथे १०/०२/२००१ रोजी झाली. तेथून त्या ३१ जुलै २०२२ रोजी परमाणु ऊर्जा शिक्षण संस्थेमध्ये मध्ये तेहतीस वर्षांची सेवा केल्यानंतर निवृत्त झाल्या.


श्रीमती. जी विजयालक्ष्मी सरमा, वरिष्ठ लिपिक (स्वेच्छा निवृत्ती) ०१/०८/२०२२ रोजी त्यांच्या सेवेतून निवृत्त झाल्यात. त्यांनी २७/०७/१९८८ रोजी हैदराबादच्या परमाणु ऊर्जा केंद्रीय विद्यालय - ३ मध्ये एल.डी.सी.- कम-लिपिक म्हणून प्रारंभिक नियुक्ती स्वीकारली. २३/१२/१९९१ रोजी त्यांना त्याच ठिकाणी यु.डी.सी. पदावर पदोन्नती मिळाली आणि त्यानंतर २९/०६/१९९८ रोजी मुंबई येथील परमाणु ऊर्जा शिक्षण संस्थेच्या केंद्रीय कार्यालयत भरती विभागात बदली झाली. परमाणु ऊर्जा शिक्षण संस्थेच्या कार्यालयात नियोजन-लेखा-व्यवस्थापन या त्यांच्या कौशल्याचा इष्टतम वापर केला गेला होता. त्यांच्या अनेक बदल्या मुंबई येथील परमाणु ऊर्जा केंद्रीय विद्यालयात झाल्या. विद्यालय क्र. – १ येथे २०००, तसेच ऑगस्ट २०१२, विद्यालय क्र.– २ येथे २००२, विद्यालय क्र. – ४ येथे ऑक्टोबर २००५, विद्यालय क्र. – ५ येथे नोव्हेंबर २००५, आणि शेवटी वरिष्ठ लिपिक म्हणून पदोन्नतीवर परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालयात १६/१०/२०१८ ते ०१/०८/२०२२ पर्यंत काम केले.





श्री. कोम्पेला वेंकटा कृष्णा सरमा, पदव्युत्तर प्रशिक्षित शिक्षक - वरिष्ठ श्रेणी , विषय – रसायनशास्त्र हे परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालय, मुंबई येथून ३१/०८/२०२२ रोजी सेवानिवृत्त झाले. १७ जून १९८६ रोजी ते परमाणु ऊर्जा केंद्रीय विद्यालय - २, हैदराबाद येथे प्रशिक्षित पदवीधर शिक्षक म्हणून रुजू झाले होते. ३०/०९/१९९८ रोजी हैदराबादहून परमाणु ऊर्जा केंद्रीय विद्यालय - २ कल्पक्कम येथे पदव्युत्तर प्रशिक्षित शिक्षक म्हणून पदोन्नतीवर त्यांची बदली झाली. सप्टेंबर २००४ ते फेब्रुवारी २००५ या कालावधीत प्रतिनियुक्तीवर परमाणु ऊर्जा केंद्रीय विद्यालय काकरापार येथे सेवा दिली तेव्हा त्यांची अध्यापन सेवा केवळ वेळेवरच नव्हती तर परमाणु ऊर्जा शिक्षण संस्थेसाठी देखील मौल्यवान होती. परमाणु ऊर्जा केंद्रीय विद्यालय - २, हैदराबाद येथे प्रशिक्षित पदवीधर शिक्षक म्हणून रुजू झाल्यापासून परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालय, मुंबई येथे सेवानिवृत्तीपर्यंत छत्तीस वर्ष सेवा दिली.

# हस्तांतरण ( बदली )



श्री. रविकांत एस राठोड, पदव्युत्तर प्रशिक्षित शिक्षक - वरिष्ठ श्रेणी, विषय - इलेक्ट्रोनिक्स यांना २२/०८/२०२२ रोजी परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालयाच्या सेवेतून मुक्त करण्यात आले, परिणामी त्यांची परमाणु ऊर्जा शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक विभागात बदली झाली..



श्री. ज्ञानेश्वर आर. मोहरीर यांची परमाणु उर्जा केंद्रीय विद्यालय - तुरमडीहचे प्राचार्य म्हणून पदोन्नतीने बदली झाल्यामुळे, त्यांनी २३/०८/२०२२ रोजी परमाणु ऊर्जा कनिष्ठ महाविद्यालतला उपप्राचार्य पदाचा कार्यभार सोडला.







## वृत्तपत्र समिति









**मुख्य संपादक:**

**डॉ. आनंद कुमार, प्राचार्य, प.ऊ.क.म. मुंबई**

**सहयोगी संपादक**

श्रीमती हेमामालिनी पी एन मेनन, पी.जी.टी. [एस.एस.] इंग्लिश

श्री. सुधीर खुल्लर, पी.जी.टी. इंग्लिश

श्री. महेश पी. माने, पी.जी.टी. इन्फो. टेक

श्रीमती बी. अन्नपूर्णा, पी.जी.टी. इकॉनॉमिक्स

डॉ. धनुर्धर झा, पी.जी.टी. हिंदी

श्रीमती चित्रा शेवाळे, पी.जी.टी. मराठी



